**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:23.03.2025** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

1) नागपूर दंगलीतल्या 104 आरोपींची ओळख पटली; 92 जणांना अटक.
दंगेखोरांकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश
2 ) आरोग्यसेवेतल्या उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं प्रदान
3) महावितरण ठरली देशातली सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी
4) शिर्डीमध्ये 13 व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाला सुरुवात
आणि
5) खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत नेमबाजीमध्ये महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरला सुवर्णपदक

**मुख्यमंत्री हिंसाचार**

नागपूरमध्ये झालेल्या दंगलीतल्या 104 आरोपींची ओळख पटली असून, त्यापैकी 92 जणांना अटक करण्यात आली आहे. या हिंसाचार प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. नागपूर मध्ये सध्या सुरू असलेल्या संचारबंदीत लवकरच शिथीलता आणण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. ते म्हणाले -----

**जे काही आपण निर्बंध घातले आहेत त्यामुळे जनजीवनावर परिणाम होतोय , व्यापारावर परिणाम होतोय त्यामुळे लवकरात लवकर त्यात शिथिलता आणावी अशी मागणी असा प्रयत्न आहे. पण त्याचवेळी, पोलीस सजग राहणार आहेत आणि कुणीही दंगा करायचा प्रयत्न केला तरीही अतिशय कडक कारवाई केली जाईल. आत्ता जे काही नुकसान झालंय हे सगळ नुकसान याची सगळी किंमत काढली जाईल आणि ते दंगेखोरांकडून वसूल केले जाईल , आणि दंगेखोरांनी ते पैसे भरले नाही तर त्यांची मालमत्ता विकली जाईल अशा प्रकारे नागपूरमध्ये किंवा महाराष्ट्रात कुठेही या गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत.**

दरम्यान, या हिंसाचारात जखमी झालेल्या एकाचा काल उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.

**मुख्यमंत्री**

नागपूर जिल्ह्यातल्या आरोग्य सेवेतल्या उमेदवारांना काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, दंत तसंच आयुर्वेद महाविद्यालयासह 9 रुग्णांलयातल्या ‘ड’ गटातल्या 680 पदांची सरळ सेवेनं भरती करण्यात आली आहे. नियुक्त झालेल्या उमेदवारांना मुख्यमंत्र्यांनी रुग्णांची उत्तम सेवा करण्याचा सल्ला दिला. निवड झालेल्या 13 उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरुपात नियुक्तीचे आदेश देण्यात आले.

**वाघ हल्ले - मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात झालेल्या जिवीतहानीची गंभीर दखल घेतली आहे. गडचिरोलीत वाघांचे हल्ले रोखण्यासाठी 3 महिन्यात आराखडा तयार करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये, गेल्या पाच वर्षात वाघांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या नगिरकांच्या कुटुंबियांना विशेष नुकसान भरपाई, अतिरिक्त वाघांचं स्थलांतर आदींचा समावेश आहे.

**महावितरण पुरस्कार**

केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाच्या वतीनं महावितरणला नुकताच सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात महा वितरण च्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महावितरणनं ग्राहक सेवेसाठी आणि वीज वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा केलेला वापर, ऊर्जेच्या वापरावर दिलेला भर, ग्राहकांसाठी वीजदर कमी करण्यासाठी आयोगासमोर मांडलेला प्रस्ताव, शेतकऱ्यांसाठी राबवलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदींचा विचार करून महावितरणची निवड करण्यात आली. ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ या योजनेच्या माध्यमातून सौर कृषी पंप बसविण्यात महावितरणनं देशात प्रथम स्थान मिळवलं आहे.

**संत साहित्य संमेलन**

वारकरी साहित्य परिषदेच्या वतीनं आयोजित 13 व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाला काल शिर्डी मध्ये सुरुवात झाली. समाज एकसंघ ठेवण्याचं सामर्थ्य संत विचारांमध्ये आहे, असं प्रतिपादन अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केलं. या संमेलनाला राज्यातून मोठ्या संख्येने वारकरी आणि संत अभ्यासक उपस्थित आहेत. श्री साईबाबा समाधी मंदीर ते संमेलनस्थळापर्यंत वारकरी दिंडी काढण्यात आली. दिंडीची सांगता अश्व रिंगणानं करण्यात आली.

**कोकण मराठी साहित्य**

जुनी ग्रंथसंपदा आणि साहित्य जतन करण्यासाठी आगामी वर्षभरात ग्रंथालयांचं आधुनिकीकरण करण्याचं काम शासनामार्फत करण्यात येईल, अशी ग्वाही सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या जिल्हा साहित्य संमेलनाचं उदघाटन काल त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते

बोलत होते.ज्येष्ठ साहित्यिक गंगाराम गवाणकर संमेलनाचे अध्यक्ष आहेत. ग्रंथ दिंडीने काल या साहित्य संमेलनाला सुरवात झाली.

**क्षयरोगदिन**

क्षयरोग अर्थात TB हा केवळ, एक संसर्गजन्य आजार नसून तो सामाजिक विषमताही दर्शवतो. दरवर्षी जवळपास साडेबारा लाख लोकांचा बळी घेणारा हा आजार, योग्य निदान आणि उपचारांमुळे पूर्णपणे बरा होऊ शकतो. मुख्यतः फुफ्फुसांवर परिणाम करणारा आणि शरीरातील इतर अवयवांमध्येही पसरू शकणारा हा आजार भारतात मोठ्या प्रमाणावर आढळतो.

देशाच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेपुढे आव्हान असणाऱ्या या आजाराबाबत सुरू असलेल्या उपाय योजना, या विषयी ऐकू या एक वृत्तांत....

**भारत हा जगातील सर्वाधिक क्षयरोगग्रस्त लोकसंख्या असलेला देश असून जगातील एकूण TB रुग्णांपैकी 25-28% रुग्ण भारतात आढळतात. देशात दरवर्षी सुमारे 26-27 लाख नवीन क्षयरुग्णांची नोंद होत असून सुमारे 5 लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू TB मुळ होतो .राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम 1962 मध्ये सुरू करण्यात आला. 2019 मध्ये या कार्यक्रमाचे नाव बदलून राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम करण्यात आल. केंद्र सरकारन 2018 मध्ये घोषित केलेल्या योजनेनुसार, भारताने 2030 च्या जागतिक उद्दिष्टाच्या आधीच 2025 पर्यंत TB निर्मूलनाचा संकल्प केला आहे. यासाठी सरकारी आरोग्य केंद्रांवर सर्व TB रुग्णांना मोफत निदान आणि 9 ते 12 महिन्यांचे अद्ययावत उपचार उपचार तसंच औषधे पुरविली जातात. TB रुग्णांना दरमहा ₹500 पोषण भत्ता देण्यात येतो. TB संदर्भात समाजामध्ये गैरसमज कमी करण्यासाठी विविध प्रचार मोहिमा राबवल्या जात असून, 2025 पर्यंत TB निर्मूलनाच लक्ष्य प्राप्त करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकान या मोहिमेत सहभागी होणे गरजेचे आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी सुहास देशपांडे , पुणे**

**ऊस- हर्षवर्धन पाटील**

राज्यात साखरेचं उत्पादन घटल्यानं साखर कारखान्यापुढे अनेक प्रश्न उभे आहेत. याबाबत केंद्रीय स्तरावर सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेण्यासाठी निवेदन देण्यात येणार असल्याचं राष्ट्रीय सहकारी कारखाना संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितलं. त्यांनी काल पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. कर्नाटक,गुजरात,महाराष्ट्र याठिकाणी ऊसाला आलेल्या पांढऱ्या तुऱ्यांमुळे ऊसाच्या वजनासह उताराही कमी झाला आहे. त्यामुळे साखरेची वाढलेली किंमत आणि कारखान्याच्या इतर प्रश्नांकरता केंद्र सरकारच्या सहकार खात्यानं यामध्ये विशेष लक्ष घालून बैठक घेण्याची विनंती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यासंदर्भात गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्याना पत्र लिहिणार असल्याचंही पाटील म्हणाले.

**कृषी विज्ञान केंद्र**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्च कमी होऊन, उत्पन्नात वाढ होत असेल, तर या तंत्रज्ञानाला आमचा विरोध नाही. मात्र हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना परवडणारं पाहिजे, असं स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजु शेट्टी यांनी म्हटलं आहे. पुण्यातील कृषी विज्ञान केंद्रावर एआय तंत्रज्ञानाद्वारे केली जाणारी ऊस शेतीची पाहणी केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

**शेतमाल विक्री महोत्सव**

वाशिममध्ये महाराष्ट्र शासन आणि  जिल्हा परिषदेचा कृषी विभाग तसेच आत्मा यांच्या वतीनं दोन दिवसीय जिल्हास्तरीय शेतमाल कृषी महोत्सवाचं आयोजन  करण्यात  आलं  आहे. वाशिम कृषी विभाग हा जिल्हा प्रशासनातील सर्वोत्कृष्ट विभाग असून संपूर्ण राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे.

**पुण्य भूषण**

ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांना अर्थशास्त्रातल्या भरीव योगदानासाठी 2025 या वर्षीचा 'पुण्यभूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीनं ही निवड केली आहे.

**खेलो इंडिया**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत नेमबाजीच्या लढतीत महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरनं सुवर्णपदकावर नाव कोरलं.10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात स्वरूपसोबत कविन केगनाळकरनं रौप्य पदक पटकवलं. ऑलिम्पिक पदक विजेता सुजांत कदमसह, प्रेमकुमार आले, आरती पाटील यांनीही रौप्य पदक मिळवलं.

**पाऊस**

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात शुक्रवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे मिरची आणि कापूस पिकांना मोठा फटका बसला आहे. शासनानं तत्काळ पंचनामे करुन भरपाई द्यावी, अशी मागणी मिरची आणि कापूस उत्पादक शेतक-यांनी केली आहे. जिल्ह्याच्या अहेरी आणि चामोर्शी तालुक्यातील काही भागातही शेतकऱ्यांना पावसाचा फटका बसला असून, यंदा मोह फुलांच्या उत्पादनावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

**हवामान**

उद्या सकाळ पर्यन्तच्या हवामानाच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार .**